महाराष्ट्र शासन
**जिल्हा नियोजन समिती**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा**

दुरध्वनी क्र. (022)
(का) 26550066
eMall-dpomsd@gmail.com

क्रमांक : जिनिस १०२९/का.०५/जि.वा.यो./इ.यु.महावि./प्रक.११/२०१९-२०/प्रमंआ/१३२६ , दिनांक : १५ . ०७ .२०१९

# जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२०
# २२०२ - सर्वसाधारण शिक्षण - शासकीय महाविद्यालयाचा विकास या योजनेचे
# प्र शा स की य मं जू री आ दे श

**वाचा:** १. महाराष्ट्र शासन,नियोजन विभाग,शासन निर्णय क्रमांक जिवायो १००७/प्रक्र.३९/ का.१४४४, दि.१६ फेब्रु.२००८.
२. अर्थसंकल्पीय अंदाज२०१९-२० भाग-दोन खर्चाचे तपशिलवार अर्थसंकल्पीय अंदाज खंड ३,ओ नियोजन विभाग,जिल्हा योजना मुंबई उपनगर.
३. प्राचार्य, आय वाय महाविद्यालय,जोगेश्वरी (पुर्व),मुंबई. यांचे पत्र क्र.इयुम/जिवायो/२०१९-२०/१७२४,दि.१८.०६.२०१९.
४. प्राचार्य, आय वाय महाविद्यालय,जोगेश्वरी (पुर्व),मुंबई. यांचे पत्र क्र.इयुम/जिवायो/२०१९-२०/१८३६,दि.०८.०७.२०१९.

शासनाने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) या योजनेचे संपूर्ण संनियंत्रण जिल्हास्तरावर करण्याच्या उद्देशाने या अंतर्गत निधी अर्थसंकल्पित करणे,वितरीत करणे आणि या निधीतून कामांना प्रशासकीय मान्यता देणे व त्याअनुषंगाने सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.त्याअर्थी जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांना अशा प्रकारच्या कामाकरीता प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.आता मी जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा या आदेशात नमूद केलेल्या तपशिलानुसार खालील अटींवर प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**अटी व शर्ती :**

१. हया योजनेवरील खर्च हा जिल्हा वार्षिक योजना(सर्वसाधारण) २०१९-२० अंतर्गत खालील नमूद केलेल्या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

| |
|---|
| **२२०२ सर्वसाधारण शिक्षण,** |
| **नियोजन विभाग -ओ-१६,**<br>**२२०२ सर्वसाधारण शिक्षण,**<br>**०३ विद्यापीठ व उच्च शिक्षण,**<br>**१०३ शासकीय महाविद्यालये व संस्था,**<br>**(३२) जिल्हा योजना-मुंबई उपनगर**<br>**(३२)(०१)शासकीय महाविद्यालयांचा विकास, (२२०२ ४३३९)**<br>**१३ कार्यालयीन खर्च, ५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री** |

२. या आदेशात दर्शविलेल्या रकमे इतकाच खर्च करण्यात यावा.

३. या कार्यक्रमांवर होणा-या खर्चाचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवण्यात यावा.या कार्यक्रमाखाली स्थानिक स्वायत्त संस्था,मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग व पत्तन अभियंता व इतर शासकीय कार्यालये यांना देय असलेल्या अनुदानाच्या खर्चासंबंधी शासन निर्णय क्र.डीपीसी-१०८४/सीआर-२१,पीआर-२, दि.२६ ऑक्टो.,१९८४ व दि.१७नोव्हेबंर,१९८४ आणि क्रं.एसपीडी-१०८९/१५३/सीआर-१५/योजना६,दि.३१.०८.१९८९ च्या शासन निर्णयानुसार आदेश पाळण्यात यावेत.

४. या योजनेअंतर्गत प्रस्तवित अनुज्ञेय कामे ही सार्वजनिक हिताची कामे आहेत असे समजण्यात यावेत.

५. प्रत्येक महिन्याच्या ५तारखेपर्यंत योजना राबविणा-या अभिकरणांनी मासिक खर्चाचा कामनिहाय प्रगती अहवाल व पूर्ण झालेल्या कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करावीत.

६. काम पूर्ण झाल्यानंतर मंजूर रक्कमेतील बचत अन्य कोणत्याही कामाकडे परस्पर वळविण्यात येऊ नये अथवा बचतीच्या रक्कमेतून नवीन कामांना प्रशासकीय मंजूरी दिली जाणार नाही.

७. या कार्यक्रमाखाली घेण्यात येणा-या सर्व कामासाठी शासनाने वेळोवेळी ठरवुन दिलेले सर्व नियम, निकष, पध्दती व शासनाचे वेळोवेळी होणारे बदल कार्यान्वयीन अभिकरणांवर बंधनकारक राहतील.

८. या आदेशान्वये मंजूर कामे विहीत मुदतीत पुर्ण करावयाची आहेत. विहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास ती कामे आपोआप रद्द समजण्यात येतील यासाठी वेगळे आदेश काढण्यात येणार नाहीत.

९. या आदेशानुसार मंजूर करण्यात आलेली कामे इतर कोणत्याही योजनेतून/कार्यक्रमातून घेण्यात (उदा.खासदार/आमदार स्थानिक विकासकार्यक्रम/नगरसेवक निधी इ.) आलेली नाहीत याची खात्री करूनच निधीच्या उपलब्धतेनुसार कामाला सुरूवात करावी.अन्यथा याची संपूर्ण जबाबदारी कार्यावयीन यंत्रणेची राहील .

१०. या योजनेवर होणा-या खर्चाचा हिशेब स्वतत्रपणे ठेवण्यात यावा.योजनेकरीता वितरीत करण्यात आलेला निधी या योजने -अंतर्गतच्या विहीत प्रयोजनासाठीच खर्च करावा. तसेच कामावर झालेला खर्च वजा जाता शिल्लक रक्कम त्वरीत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावी.

११. या योजनेवर होणा-या खर्चाचा हिशेब स्वतत्रपणे ठेवण्यात यावा.योजनेकरीता वितरीत करण्यात आलेला निधी या योजने -अंतर्गतच्या विहीत प्रयोजनासाठीच खर्च करावा. तसेच कामावर झालेला खर्च वजा जाता शिल्लक रक्कम त्वरीत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावी.

१२. काम सुरु करण्यापुर्वी कार्यान्वयीन यंत्रणेने संबंधीत सक्षम अधिका-याकडुन कामांस तांत्रीक मंजुरी घेणे बंधणकारक आहे.तांत्रीक मंजुरीशिवाय कामांस सुरुवात करण्यात येऊ नये. सक्षम अधिका-याकडुन कामांस तांत्रीक मंजुरी प्राप्त करुन घेऊन तांत्रीक मंजुरीची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात यावी.

१३. योजनेनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या कामांची तांत्रिक गुणवत्ता राखण्याची व योग्य ती तपासणी करण्याची तसेच त्यांचे संनियंत्रण मुल्यमापन

१४. जिल्हा वार्षिक योजनेनेतील अंमलबजावणीतील गैरव्यवहार,लेखा आक्षेप,लेखासमिती,आणि विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबंधित कार्यावयीन यंत्रणा व त्याचा प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

१५. अपुर्ण कामांची कामाहिय माहिती व शिल्लक असलेल्या निधीची सविस्तर माहिती दि.५मार्च,२०२० अखेर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कार्यावयीन अधिकारी यांनी सादर करणे बंधनकारक आहे.

१६. लेखा तपासणीसाठी आवश्यक असणारी माहिती कार्यान्वयीन अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे विहित कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे.

१७. यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करतांना खरेदी करतांना त्यासंबंधिच्या नेहमीच्या कार्यपध्दतीविषयक नियमांचे आणि सर्वसाधारण निर्देशांचे पालन करण्यात यावे.

१८. निधी खर्च करतांना मासिक निधी विवरण पत्रात (Cash-flow Statement ) ज्या दरमहा खर्च रकमा दर्शविलेल्या आहेत त्याच्याशी सुसंगत असाव्यात.

सदरहू प्रशासकीय मान्यता ही प्राचार्य, ईस्माईल युसूफ महाविद्यालय जोगेश्वरी,मुंबई यांच्या दि. १८.०६.२०१९ व दि.८.७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मागणीनुसार व निरनिराळ्या स्तरावर केलेल्या मागणीचा विचार करुन प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१९-२० करिता खालील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार रु.३०१.००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी एक लाख मात्र) इतक्या रकमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

| कामाबाबतचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचा तपशिल / खरेदीचा तपशिल | एकुण नग | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये) | प्रशासकीय मंजूरी रक्कम रुपये |
| अ | २२०२ ४३३९, १३ कार्यालयीन खर्च | | | |
| 1 | RAM 4 GB | 20 | 0.50 | 0.50 |
| 2 | Wired Keyboard + Mouse ( USB 2.0) | 20 | 0.20 | 0.20 |
| 3 | Printer | 1 | 0.30 | 0.30 |
| | एकूण ( अ ) | | 1.00 | 1.00 |
| ब | २२०२ ४३३९, ५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री खर्च | | | |
| 1 | Liquid Chromatography Mass Spectrometer | 1 | 74.00 | 74.00 |
| 2 | Automatic Thin Layer Chromatography Sampler System | 1 | 38.00 | 38.00 |
| 3 | Microscope | 20 | 5.20 | 5.20 |
| 4 | Magnetic Stirrer | 5 | 1.50 | 1.50 |
| 5 | Conductivity Meter | 1 | 0.98 | 0.98 |
| 6 | Digital Potentiometer | 2 | 0.40 | 0.40 |
| 7 | pH meter | 2 | 0.64 | 0.64 |
| 8 | SQ-GCMS Single Quadruopole Gas Chromatograph Mass Spectrometer System | 1 | 40.00 | 40.00 |
| 9 | Colorimeter | 3 | 0.36 | 0.36 |
| 10 | Autoclave | 1 | 0.70 | 0.70 |
| 11 | Centrifuge Machine | 1 | 0.65 | 0.65 |
| 12 | Incubator | 1 | 0.50 | 0.50 |
| 13 | TLC plate apparatus | 1 | 0.25 | 0.25 |
| 14 | UV Chamber | 2 | 0.32 | 0.32 |
| 15 | Waterbath | 2 | 0.50 | 0.50 |
| 16 | CHNS/O Analyser | 1 | 42.00 | 42.00 |
| 17 | Automated Chemistry Analyser | 1 | 65.00 | 65.00 |
| 18 | Raspberry Pi Kit | 13 | 1.30 | 1.30 |
| 19 | Rapid Thermal Annealing System | 1 | 7.00 | 7.00 |
| 20 | Computer | 40 | 20.00 | 20.00 |
| 21 | Laptop | 2 | 0.70 | 0.70 |
| | एकूण ( ब ) | | 300.00 | 300.00 |

| अ. क्र. | कामाचा अंमलबजावणी करणा-या अभिकरणाचे नांव | योजनेचे नाव | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकिय रक्कम(लाख) | प्रशासकीय मंजूरीची रक्कम(लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य, ईस्माईल युसूफ महाविद्यालय जोगेश्वरी, मुंबई | महाविद्यालयांचा विकास २२०२ ४३३९ | १३, कार्यालयीन खर्च | १.०० | १.०० |
| २ | | | ५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री खर्च | ३००.०० | ३००.०० |
| | | | एकूण | ३०१.०० | ३०१.०० |

(प्रशासकीय मंजूरीची एकुण अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी एक लाख मात्र)

**स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे.**

सही/-
( सचिन कुर्वे )
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति:- प्राचार्य,ईस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी,मुंबई.

प्रत:- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीकरीता अग्रेषित:

१. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रा (पुर्व), मुंबई-४०० ०५१.

२. लेखा अधिकारी, जि.नि.स. मुंबई उपनगर जिल्हा

३. निवड नस्ती .

( संजय काळे )